जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक -३५८ दिनांक - १३/०५/२०२३**

**बंडगार्डन पोलीस स्टेशन,पुणे शहर**

**दरोड्याच्या गुन्ह्यातील आरोपीतांच्या आवळल्या मुसक्या.**

बंडगार्डन पो.स्टे. गु.रजि.नं. १४६/२०२३ भा.द.वि. ३९२,३४ मधील फिर्यादी हे दि. ११/०५/२०२३ रोजी आय बी चौकाजवळ, विधानभवन चौकाकडे जाणा-या रस्त्यावर त्यांचे मित्रासोबत गप्पा मारत थांबलेले असताना सदर ठिकाणी एका ॲक्टिवा दुचाकीवरून यातील आरोपीतांनी त्यांचेकडील ॲक्टिवावरून खाली उतरून फिर्यादी यांना "ए काय करताय रे तिकडे" असे म्हणून फिर्यादी यांची कॉलर पकडली, तेव्हा फिर्यादी हे तेथून पळून जात असताना आरोपीत यांनी फिर्यादी यांना लाथाबुक्क्यांनी मारहान करून त्यांचे गळ्यातील पाच ग्रॅम वजनाची सोन्याची चैन जबरदस्तीने हिसका मारून घेवून ॲक्टिवावर बसून ते तेथून निघून गेले होते. सदरबाबत गुन्हा वरील प्रमाणे गुन्हा नोदं करण्यात आला आहे.

सदरवेळी घटनास्थळावरील आरोपीतांचे निघून जाण्याच्या मार्गावरील सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे ताडीवाला रोडमार्शलवरील पोलीस अंमलदार जाधव, व पोलीस अंमलदार बधे यांनी आरोपीतांचा शोध घेत असताना त्यांना त्यांचे गुप्त बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, वर नमुद गुन्ह्यातील सशंयीत वर्णनाचा एक संशयीत इसम दुचाकीसह पाच बिल्डींग जवळ थांबलेला आहे,अशी बातमी मिळाल्याने त्यास पोलीस उप निरीक्षक, संतोष वाघमारे व पोलीस अंमलदार जाधव तसेच पोलीस अंमलदार बधे यांनी सापळा लावून पकडून चौकशी केली असता त्याने त्यांचे नाव **शाहीद अब्दुल दाउत, वय १८ वर्षे, रा. राजु पुना जनरल स्टोअर्स जवळ, घर नं.८, १३ ताडीवाला रोड, पुणे असे सांगितले,** त्याचेकडे सदरच्या घटनेसबंधीने चौकशी केली असता त्याने सदरचा गुन्हा त्याचे इतर साथीदारांच्या सहाय्याने केला असल्याची कबुली दिल्याने त्याचे दोन साथीदारांना गुन्हाचे कामी ताब्यात घेतले असता ते विधीसंघर्षीत बालक असल्याचे निष्पन्न झाले. तसेच आरोपी नामे १) **शाहीद अब्दुल दाउत, यांस** मा.न्यायालयात हजर केले असता त्यांची दि.१५/०५/२०२३ रोजी पर्यंत पोलीस कस्टडी मंजूर केली आहे. सदर तपास दरम्यान ताब्यात घेतलेल्या दोन विधीसंघर्षीत बालकांकडे **गुन्हयाचे अनुषंगाने तपास केला तसेच सीसीटीव्ही फुटेज तपासले असता गुन्ह्यामध्ये अधिक आरोपी निष्पन्न झाल्याने त्याबाबत फिर्यादी यांचेकडे तपास करून त्यांचा सविस्तर पुरवणी जबाब नोंदं करून गुन्हयामध्ये भांदवि कलम ३९५ ची वाढ करण्यात आली आहे.**

**ताब्यात घेतलेल्या विधीसंघर्षीत बालकांकडे तपास करून आणखी दोन विधी संघर्षीत बालक व आरोपी नामे सुरज हरिहर सोनकर, वय १८ वर्षे, रा. दुष्काळ झोपडपट्टी, गल्ली नं २६, १३ ताडीवाला रोड, पुणे हे निष्पन्न झाल्याने त्यांना ताब्यात घेण्यात आले असून सदरच्या एकुण चार विधीसंघर्षीत बालकांना** बालन्यायालय येरवडा येथे हजर केले आहे. तसेच आरोपी नामे **सुरज हरिहर सोनकर यांस** मा.न्यायालयात हजर केले असता त्याची दि.१५/०५/२०२३ रोजी पर्यंत पोलीस कस्टडी मंजूर केली आहे.

गुन्ह्यातील फिर्यादी यांची मारहाण करुन जबदस्तीने हिसकावून नेलेली **२८,०००/- रू. रक्कमेची सोन्याची चैन पोलीस कोठडीमधील** आरोपी नामे **शाहीद अब्दुल दाउत** याने दिलेल्या निवेदनाप्रमाणे त्याचे घरातून हस्तगत करण्यात आली आहे. तसेच दाखल गुन्ह्यात आरोपीतांनी गुन्हा करतेवेळी वापरलेल्या दोन दुचाकी ह्या गुन्ह्याचेकामी जप्त करण्यात आल्या आहेत.सदर दाखल गुन्ह्याचा पुढील तपास मा.वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली पो.उप निरीक्षक श्री रविंद्र गावडे हे करीत आहेत.

सदरची कारवाई मा.अप्पर पोलीस आयुक्त,पश्चिम प्रादेशीक विभाग श्री प्रविण पाटील मा.पोलीस उप आयुक्त, श्रीमती स्मार्तना पाटील परिमंडळ-२, मा.सहा. पोलीस आयुक्त लष्कर विभाग, श्री.आर, एन. राजे वरिष्ठ पोलीस निरीक्षक,संतोष पाटील,पोलीस निरीक्षक गुन्हे,श्रीमती आश्विनी सातपुते,यांच्या मार्गदर्शनाखाली तपास पथकाचे पोलीस उप-निरीक्षक रविंद्र गावडे,सहा.फौज.मोहन काळे,अनिल कुसाळकर, संजय वणवे, शिवाजी सरक, मनोज भोकरे, विशाल जाधव व अमित बधे यांचे पथकाने केली आहे.